बहुजन हिताय। बहुजन सुखाय।।

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कला व वाणिज्य महाविद्यालय, खेडगाव

ता. दिंडोरी, जि. नाशिक. फोन : (०२५५७) २३५१८३

E-mail : srcollege.khedgaon@mvp.edu.in
Website : www.khedgaoncollege.ac.in

ID No : PU/NS/AC/076/2003
PUN - CAAN017890

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न पदवी महाविद्यालय

# PROSPECTUS



## Senior College

प्राचार्य

**डॉ. श्रीमती एस. टी. वाघ**

(एम.एस्सी., डी.एच.एम., एम.फिल., पीएच. डी.)

# 2022-23

## College Mission-

Our efforts are dedicated to impart quality and value based education to student and main streaming the practices that facilitate intellectual, emotional, physical and cultural growth of students.

## College Vision-

To establish equal education opportunity without regard to gender, colour, race, religion, national origin or disability.

To promote higher education for people in rural, tribal and backword areas and enable students to enter dynamic world confidently and contribute to the society productively.


## Objectives-

1. To promote higher education for people in rural, tribal and backword areas.
2. To create social awareness, social commitment and patriotism among the students.
3. To develop confidence among rural students who otherwise consider themselves inferior to urban students.
4. To inculcate good moral values and sense of humanity.
5. To plan and conduct curricular and extension activities.
6. To achieve status of best college in rural and tribal area.
7. To increase the strength of rural, tribal students in the college.


राष्ट्रीय सेवा योजना










उद्‌घाटन सोहळा


वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खेडगाव ता. दिंडोरी (नाशिक) नुतन इमारत





# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेची पूर्वपीठीका

शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही या महात्मा ज्योतिराव फुले यांच्या क्रांतिकारी विचाराने महाराष्ट्रातील बहुजन समाजात शिक्षणविषयक भान निर्माण केले. याच विचाराचा पाठपुरावा राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख आदी विचारवंत समाजसुधारकांनी अत्यंत तन्मयतेने केला. खेड्यापाडयात पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालये उघडल्याशिवाय व क्रमाने उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये काढल्याशिवाय शिक्षणाचा प्रकाश पोहचणार नाही ही धारणा या समाजधुरिणांची होती. त्यांच्या परंपरेचे पाईक होऊन कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपतदादा मोरे, डी.आर. भोसले आदी कर्मवीरांनी नाशिक जिल्ह्यातील शिक्षणप्रसाराच्या कार्याचा वसा घेतला. सन १९१४ साली उदोजी मराठा वसतिगृह स्थापन करून या महत्कार्याची मुहूर्तमेढ रोवली. सन १९१३ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या नाशिक येथील अधिवेशनात धार संस्थानाचे राजे श्रीमंत उदोजीराव पवार यांनी रुपये १०,००० ची देणगी देऊन संस्थेचा पाया तर भक्कम केलाच पण संस्था सुस्थिर व्हावी हा दृष्टिकोन ठेवून रू. २,००० चे वार्षिक अनुदानही सुरू केले. तसेच राजर्षी शाहू महाराज यांनी रू. १५०००, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी रू. १२०००, ग्वाल्हेर नरेश श्रीमंत माधवराव महाराज यांनी रू. १०,००० व उद्योजक पांडुरंग जावजी चौधरी प्रभृती यांनी रू. ३०००, अशा अनेक शिक्षणप्रेमी महानुभवांनी त्याकाळी देणग्या देऊन संस्थेच्या कार्यविस्तारास शुभेच्छा दिल्या.

'बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।' हे ब्रीद अंगीकारीलेल्या संस्थेच्या कार्यास मदतीचा हातभार लावण्यासाठी तत्कालीन सामाजिक कार्यकर्ते शंकरराव कदम कातरणीकर, विठ्ठलराव गाढवे, कीर्तिवानराव निंबाळकर, विठोबा पाटील कानळदकर, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, आण्णासाहेब मुरकुटे हे पुढे नावारूपास आली. अनेक ठिकाणच्या दानशूर व्यक्तींमुळे आणि शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्त्यामुळे संस्थेचे रोपटे बहरू लागले. संस्थेचा पुढे वटवृक्ष झाला. सन १९६४ साली संस्थेचे सुवर्ण महोत्सव, सन १९८९ साली अमृत महोत्सव साजरे झाले. सन २०१४ साली संस्थेचा शताब्दी महोत्सव साजरा झाला. संस्थेचे सभासद, संस्थेचा शाखाविस्तार, विद्यार्थी संख्या, सेवकसंख्या यांचा तपशील स्वतंत्रपणे दिलेला आहे. प्रगतीची ही मजल अक्षरश: थक्क करणारी आहे. यासाठी संस्थेचे आजी माजी पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळीतील सदस्य यांचे योगदान मौलिक आहे.

संस्थेच्या या शैक्षणिक व सामाजिक जनसेवेबद्दल सन २००० साली महाराष्ट्र शासनाने राज्य पुरस्कार देऊन गौरविले आहे तर २००६ साली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने प्रवर्तित केलेला पंजाबराव देशमुख पुरस्कार देऊन संस्थेची प्रशंसा केली आहे.

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टिक्षेपात *

| | |
|---|---|
| स्थापना | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | रजि. नं. ए- ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | १०,२९१ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | ४९९ |
| शाखांची संख्या | ४८७ |
| विद्यार्थ्यांची संख्या | २,११,४१९ |
| सेवक संख्या | ९,६४१ |
| अंदाजपत्रक | सुमारे रु. ८०१ कोटी ०९ लाख (२०२१-२२) |

## * शाखा विस्तार *

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७३ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | आय.टी.आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७० | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २२ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | कृषी विद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ | ललितकला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०८ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ६३ | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०४ | परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०१ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालय | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | समाजकार्य महाविद्यालय | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापन संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |
| | | **एकूण** | ४८७ |

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खेडगाव

ता. दिंडोरी, जि. नाशिक.

## * माहिती पत्रक *

### (वरिष्ठ महाविद्यालय)

### सन २०२२ - २०२३

**महाविद्यालयासंबंधी थोडेसे**

जून २००३ मध्ये स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाचे चालू वर्षी २० व्या वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ग्रामीण, आदिवासी व डोगंरी भागातील या महाविद्यालयाने गुणात्मक प्रगतीचा आदर्श निर्माण केला आहे. सध्या महाविद्यालयात कला आणि वाणिज्य दोन्ही शाखेची पूर्ण वर्ग सुरू असून महाविद्यालयामध्ये ग्रामीण, आदिवासी व डोंगरी विभागात शिक्षणाचे नवे व्दार उघडले गेले आहे. महाविद्यालयात प्रशिक्षित व तज्ञ प्राध्यापक वर्ग उपलब्ध आहे. तसेच कार्यालयीन कामासाठी अनुभवी प्राध्यापकेत्तर वर्ग उपलब्ध आहे.

## * महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये *

**नविन वास्तू :**

पिंपळगांव - वणी रस्त्यावर महाविद्यालयाची नवीन, भव्य व आकर्षक इमारत तयार झालेली आहे. हवेशीर व निवांत वातावरण ही या परिसराची वैशिष्टे. ग्रंथालय आणि वाचन कक्षांची सोय आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी पिण्यासाठी पाण्याची टाकी व स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय आहे.

**संगणक प्रशिक्षण :**

संगणक साक्षरता ही काळाजी गरज आहे. हे लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून संगणक प्रशिक्षण सुरू झालेले आहे, प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला हे प्रशिक्षण सक्तीचे आहे.

**प्राध्यापक वर्ग :**

महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात अनुभवी तज्ज्ञ व उच्च शिक्षीत पीएच.डी., एम.फील, नेट, सेट पदवी प्राप्त केलेला आणि विद्यार्थ्यांबद्दल कळकळ असलेला उत्साही आणि कार्यक्षम प्राध्यापक वर्ग महाविद्यालयास लाभला आहे.

**समृध्द ग्रंथालय आणि अभ्यासिका :**

ग्रंथालय हा शैक्षणिक संस्थेच्या उत्कृष्टपणाची खूण या जाणिवेने महाविद्यालयाचे ग्रंथालय सर्व विषयांचे पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ यांनी समृध्द असे आहे. ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सोय करण्यात आली असून या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक ती क्रमिक पुस्तके मिळू शकतात. विद्यार्थीनींसाठी ग्रंथालयाची स्वंतत्र व्यवस्था केलेली आहे.

सद्यस्थितीत ग्रंथालयात ३७१९ ग्रंथ उपलब्ध असून १४ मासिके व १० दैनिक वृत्तपत्रे येतात. तसेच ग्रंथालयात शैक्षणिक सी.डी. ४० आहेत.

१) ग्रंथालयात प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

२) विविध स्पर्धा परिक्षांचे (MPSC / UPSC) वाचन साहीत्य विद्यार्थ्यांना ग्रंथालयात वाचनासाठी उपलब्ध आहे.

**पुस्तक पेढी :**

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके सहाय्य करण्यासाठी पुस्तक पेढी उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना या पेढीतून वर्षाभर वापरण्यासाठी पुस्तके मिळू शकतात. अशी पुस्तके मिळवण्यासाठी गरजू विद्यार्थ्यांनी योग्यवेळी अर्ज करणे आवश्यक असते.

**कलागुणांना वाव :**

विद्यार्थ्यांच्या वाङमयातील गुणांना वाव देण्यासाठी पाराशरी या नावाने नियतकालिकाचा वार्षिक अंक प्रसिध्द केला जातो. तसेच त्यांच्या साहित्यिक आणि इतर कलागुणांना व्यापक संधी देण्यासाठी वादविवाद, कलामंडळ, भिंत्तीपत्रके इ. उपक्रमही राबविले जातात.

**समाजदिन :**

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे आद्य संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या जयंतीदिनी समाजदिन साजरा केला जातो. या निमित्ताने निबंध वक्तृत्व, वादविवाद, सामान्यज्ञान परीक्षा अशा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

**SAP प्रशिक्षण केंद्र :**

विद्यार्थ्यांना कंपनी व व्यावसायिक क्षेत्रातील Finance, Accounting, Tally या विषयाशी संबंधित SAP प्रशिक्षणाची माफक दरात सोय उपलब्ध आहे.

**वार्षिक स्नेहसंमेलन :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन घेण्यासंबंधीचा अंतिम अधिकार मा. प्राचार्यांना राहील. विद्यार्थ्यांकडून वार्षिक स्नेहसंमेलनाबाबत कोणतीही सूचना विचारात घेतली जाणार नाही.

**शारीरिक शिक्षण आणि एन.एन.एस.:**

विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबर त्यांच्या शारीरिक विकासाकडेही लक्ष देण्यात येते. विद्यार्थ्यांसाठी खास देशी विदेशी खेळांची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा (एन्.एन्.एस्.) उपक्रम चालू असून समाजसेवेची व शारीरिक कष्टाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेत सामील होता येते. राष्ट्रीय योजनेत प्रौढ साक्षरता उपक्रमातही विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो. महाविद्यालयात एन.एस.एस.चे २०० विद्यार्थ्यांचे युनिट उपलब्ध आहे.

**बहि:शाल व्याख्यानमाला/ज्येष्ठ नागरीक व्याख्यानमाला :**

पुणे विद्यापीठांतर्गत बहि:शाल शिक्षण मंडळ महाविद्यालयात कार्यरत असून या मंडळातर्फे डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला, एक दिवसीय शिबीरे, चर्चासत्रे, परीसंवाद इत्यादी उपक्रम राबविले जातात.

**विद्यार्थी विकास मंडळ विविध योजना :**

विद्यार्थी विकास मंडळातर्गंत महाविद्यालयात विविध योजना राबविल्या जातात.

**१) कमवा व शिका :**

गरजू व होतकरू विद्यार्थ्यांस काम करून आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने या महाविद्यालयात कमवा व शिका ही योजना राबविली जाते. यात विद्यार्थ्यांना महाविद्यालयात साधारण दोन तासासाठी काम देवून आर्थिक मोबदला देण्यात येतो.

२) विशेष मार्गदर्शन योजना

३) विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास योजना

४) निर्भय कन्या अभियान

५) समर्थ भारत अभियान

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धेला अनन्यसाधरण महत्व आहे. ही गरज ओळखून आमच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र चालविले आहे. यामध्ये विविध स्पर्धा परिक्षेची माहिती त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रमाची तसेच लेखी आणि मौखिक परिक्षेची पुर्वतयारी करून घेतली जाते. त्यासाठी तज्ञ प्राध्यापकांची नेमणूक करून गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**रोजगारक्षम कौशल्य विकास योजना :**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पुणे विद्यापीठाची डॉ. एम.आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य विकास योजना महाविद्यालयात सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेत विद्यार्थ्यांना रोजगार विषयक मार्गदर्शन केले जाते. यासाठी औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना तसेच अनुभवी व्यक्तिंना महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रीत केले जाते.

**व्यक्तिमत्व विकास केंद्र :**

पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांच्या आणि विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व विकासाला वाव आणि चालना देण्यासाठी पुणे विद्यापीठ व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासुन व्यक्तीमत्व विकास केंद्र सुरू करण्यात आलेले असुन त्याअंतर्गत वर्षभरात विविध व्याख्यानांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना पुढील विषयांवर मार्गदर्शन केले जाते.

१. सर्जनशिलता (Creativity)
२. प्रेरणा (Motivation)
३. भावनिक बुध्दीमत्ता (Emotional Inteiligence)
४. निर्णय प्रक्रिया (Decision Moting)
५. प्रभावी देहबोली (Effective Bodylanguage)
६. संघभावना जोपासणे (Team work)
७. समस्या परिहार कौशल्य (Problem Solving)
८. ध्येय निश्चिती (Goal forming)

**आविष्कार :**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधन विषयक रूची वाढावी यासाठी विद्यापीठाकडून आविष्कार अंतर्गत संशोधन विषयक स्पर्धा आयोजित केली जाते. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली जाते.

**मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्याला वैयक्तीक खाजगी, सामाजिक, आर्थिक, लैंगिक, कौटुंबिक, अभ्यासविषयक इ. अनेक समस्या असतात. या समस्या सोडविण्यासाठी समुपदेशकांची गरज असते. विद्यार्थ्यांच्या जीवनातील समस्या सोडविण्यासाठी महाविद्यालयात मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरू केलेले आहे. या विभागासाठी समुपदेशकाची (counseller) ची नेमणूक करून विद्यार्थ्यांना दिशा देण्याचे व दैनंदिन समस्या सोडविण्याचे काम या केंद्रामार्फत केले जाते.

**रोजगार संधी** (Placement Cell) **:**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगार संधी मिळाव्यात ह्या हेतूने रोजगार संधी केंद्र सुरू करण्यात आले असून, त्याद्वारे विविध क्षेत्रातील आवश्यक मनुष्यबळाची माहीती घेवून विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात नोकरीसाठीच्या मुलाखती (Campus Interviews) आयोजित केल्या जातात. यातून विद्यार्थ्यांना अनेक ठिकाणी उच्चपदावर रोजगार संधी प्राप्त झाल्या आहेत. तसेच व्यवसाय मार्गदर्शन करण्यात येते.

**व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण :**

महाविद्यालय व जनशिक्षण संस्थान नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने बेकींग/कुकींग, ब्युटीशियन, कॉम्प्युटर प्रशिक्षण, तंत्रज्ञान प्रशिक्षण, कुटीरोद्योग, छंद वर्ग या सारखे कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते.

**पाराशरी :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन कला गुणांना वाव देण्यासाठी अभ्यासिका व विविध अभ्यासेतर विद्यार्थ्यांचा सहभागाच्या उपक्रमांची माहिती आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी पाराशरी या महाविद्यालयाच्या नियतकालीकाचा अंक दरवर्षी प्रसिद्ध केला जातो.

**आरोग्य केंद्र :**

विद्यार्थी व सेवकांची गरज लक्षात घेवून महाविद्यालयात आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रामार्फत मातृसंस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहकार्याने विद्यार्थी व सेवकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच प्रथम वर्षाच्या कला, वाणिज्य या विद्यार्थ्यांची आयोजित करून उपक्रम राबविले जातात. यात विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदत संस्थेच्या मेडीकल कॉलेज तर्फे करण्याचा प्रयत्न असतो.

**विद्यार्थी मेडिक्लेम पॉलीसी :**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता म्हणून रू. १७५/- मध्ये वैयक्तिक मेडिक्लेम पॉलीसी दिली जात आहे. या पॉलीसी अंतर्गत विद्यार्थ्यास संपूर्ण वर्षभरात रू. ५०,०००/- पर्यंत वैयक्तिक वैद्यकीय (आजारपण) खर्च घेता येईल. तसेच शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या वडिलांस अपघाती मृत्यू ओढवल्यास विद्यार्थ्याचे पुढील शिक्षण चालू राहण्यासाठी रू. २,००,०००/- पर्यंत विमा संरक्षण दिले जाणार आहे. तर आईचा अपघाती मृत्युनंतर विद्यार्थ्यास मिळणारी रक्कम रूपये १,००,०००/- आहे. तसेच शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचा अपघाती मृत्यू ओढवल्यास पालकांना रू. १,००,०००/- पर्यंत पॉलीसीचा लाभ मिळेल.

**महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष :**

२०२२-२०२३ शैक्षणिक वर्ष १५ जून २०२२ पासून सुरू होईल आणि ३० एप्रिल २०२३ रोजी संपेल. शैक्षणिक वर्ष दोन सत्रात विभागलेले राहील.

**महाविद्यालयाची वेळ :**

महाविद्यालयाची वेळ: सकाळ सत्र ७.३० ते १२.३० वा. या वेळेत सोयीनुसार बदल करण्यात येईल.

**कार्यालयीन कामकाजाची वेळ :**

सकाळी १०.३० ते सायं. ५.३० वा. पर्यंत राहील.

**२०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची रूपरेषा**

चालू शैक्षणिक वर्षामध्ये पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार पुढील वर्गाचे अभ्यासक्रम आमच्या महाविद्यालयात शिकविण्यात येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| **कला :** | १) एफ. वाय. बी.ए. | **वाणिज्य :** | १) एफ. वाय. बी. कॉम. |
| | २) एस. वाय. बी.ए. | | २) एस. वाय. बी. कॉम. |
| | ३) टी. वाय. बी. ए. | | ३) टी. वाय. बी. कॉम. |

**प्रवेश मर्यादित :**

विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे प्रत्येक तुकडीत १२० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा असल्याने सर्व पदवी वर्गात प्रवेश मर्यादित आहे याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## ❊ कला शाखा ❊

(Three years Integrated B.A. Degree Course) कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येक वर्षी ६ विषय आणि द्वितीय वर्गास ६ याप्रमाणे ३ वर्षात १८ पेपर्सचा अभ्यास करावा लागेल. पहिल्या वर्षी निवडलेल्या विषयांचा संबंध तिन्ही वर्षासाठी येत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आरंभीच्या विषयांची निवड काळजीपूर्वक करावी.

### अ) बी.ए. परीक्षेसाठी विविध विषय

**प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)**

शै.वर्ष २०१९-२० पासून प्रथम वर्षासाठी (एफ.वाय.बी.ए.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

प्रथम वर्ष कलापरीक्षेसाठी या महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय खालीलप्रमाणे :-

१) ग्रुप A इंग्रजी (Compulsory English)
२) ग्रुप B मराठी (Marathi)
३) ग्रुप D अर्थशास्त्र (Economics)
४) ग्रुप E राज्यशास्त्र (Politics)
५) ग्रुप G भूगोल (Geography)
६) ग्रुप H मानसशास्त्र (Psychology)
७) ग्रुप J जनरल इंग्रजी (Optional English)

**सूचना :**

इंग्रजी (Compulsory) हा विषय प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक आहे. राहिलेल्या ग्रुपमधून पाच विषय विद्यार्थ्यांने निवडावयाचे आहेत.

## १)	द्वितीय वर्ष कला (एस.वाय.बी.ए.) (स्पेशल)

शै.वर्ष २०२०-२१ पासून प्रथम वर्षासाठी (एस.वाय.बी.ए.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

अनिवार्य इंग्रजी(Compulsory English) याशिवाय एफ.वाय.बी.ए. मध्ये घेतलेल्या विषयांपैकी चार जनरल व एक स्पेशल असे एकूण सहा विषय घ्यावे लागतील.

बी.ए. स्पेशलसाठी महाविद्यालयात खालील विषयांची सोय आहे.

१) अनिवार्य इंग्रजी

२) जनरल - मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भुगोल, मानसशास्त्र

३) स्पेशल - मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, इंग्रजी, भूगोल

## तृतीय वर्ष कला (टी. वाय. बी.ए.) (स्पेशल)

शै.वर्ष २०२१-२२ पासून प्रथम वर्षासाठी (एस.वाय.बी.ए.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल. बी.ए. डिग्री पुर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांला एकूण १४० क्रेडीटची आवश्यकता असते. १३२ क्रेडीट हे शैक्षणिक अभ्यासक्रमातून प्राप्त होतात. तर ०८ क्रेडीट हे अतिरिक्त अभ्याक्रमाव्यतिरिक्त मिळवावे लागतात. विद्यार्थ्याला तीन वर्षामध्ये १४० क्रेडीट पूर्ण करणे अनिवार्य असते.

अनिवार्य इंग्रजी (Compulsory Engilsh) व एस. वाय. बी.ए. मध्ये घेतलेले तीन जनरल व दोन स्पेशल असे एकुण सहा विषय द्यावे लागतील.

१) अनिवार्य इंग्रजी

२) जनरल - मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भुगोल, मानसशास्त्र

३) स्पेशल - मराठी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, इंग्रजी, भूगोल

# B. A. Credit Pattern Scheme

| Semester | Core Courses (CC) | Ability Enhancement Compulsory Course (AEC) | Skill Enhancement Course (SEC) | Discipline Specific Elective Courses (DSE) | Generic Elective(GE) | Total Credit |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Compulsory English (3)<br>CC – 1 A (3)<br>CC – 2 A (3)<br>CC – 3 A (3)<br>CC – 4 A (3)<br>CC – 5 A (3) | | | | | 18 |
| II | Compulsory English (3)<br>CC – 1 B (3)<br>CC – 2 B (3)<br>CC – 3 B (3)<br>CC – 4 B (3)<br>CC – 5 B (3) | | | | | 18 |
| III | Compulsory English (3)<br>MIL 2 (2)<br>CC – 1 C (3)<br>CC – 2 C (3) | Environment Science (2) | SEC 1 A(3)<br>SEC 2 A (2) (Value/skill based course) | DSE 1 A (3)<br>DSE 2 A (3) | | 24 |
| IV | Compulsory English (3)<br>MIL 2 (2)<br>CC – 1 D (3)<br>CC – 2 D (3) | Environment Science (2) | SEC 1 B (3)<br>SEC 2 B (2) (Value/skill based course) | DSE 1 B (3)<br>DSE 2 B (3) | | 24 |
| V | Compulsory English (3)<br>CC – 1 E (3)<br>CC – 2 E (3) | | SEC 1 C (3)<br>SEC 2 C (2) (Value/skill based course) | DSE 1 C (3)+1 Research Project, Field work etc<br>DSE 2 C (3)+1 Research Project, Field work etc. | G.E. 1 (2) | 24 |
| VI | Compulsory English (3)<br>CC – 1 F (3)<br>CC – 2 F (3) | | SEC 1 D (3)<br>SEC 2 D (2) (Value/skill based course) | DSE1 D (3)+1 Research Project, Field work<br>DSE 2 D (3)+1 Research Project, Field work | G.E.2 (2) | 24 |
| Total Credit | 76 | 04 | 20 | 28 | 04 | 132 |

**B.A. Existing Pattern & New Pattern :**

| Semester | Existing Pattern | New CBCS Pattern |
|---|---|---|
| I | Compulsory English | Compulsory English (3) |
| | G 1 ( General Paper) | CC – 1 A (3) |
| | G 2 ( General Paper) | CC – 2 A(3) |
| | G 3 ( General Paper) | CC – 3 A(3) |
| | G 4 ( General Paper) | CC – 4 A(3) |
| | G 5 ( General Paper) | CC – 5 A(3) |
| II | Compulsory English | Compulsory English (3) |
| | G 1 ( General Paper) | CC – 1 B(3) |
| | G 2 ( General Paper) | CC – 2 B(3) |
| | G 3 ( General Paper) | CC – 3 B(3) |
| | G 4 ( General Paper) | CC – 4 B(3) |
| | G 5 ( General Paper) | CC – 5 B(3) |
| | | |
| III | Compulsory English | Compulsory English (3) |
| | | MIL 2 (2) (Modern Indian Languages ) |
| | G 2 ( General Paper) | CC 1 C (3) |
| | G 2 ( General Paper) | CC 2 C (3) |
| | G 2 ( General Paper) | SEC 1 A (3) |
| | | SEC 2 A (2) (Skill Base Course of DSE Subject) |
| | S1 (Special 1) | DSE 1 A (3) |
| | S2 (Special 2) | DSE 2 A (3) |
| | Environment Science | Environment Science (2) |
| IV | Compulsory English | Compulsory English (3) |
| | | MIL 2 (2) (Modern Indian Language) |
| | G 2 ( General Paper) | CC 1 D (3) |
| | G 2 ( General Paper) | CC 2 D (3) |
| | G 2 ( General Paper) | SEC 1 B (3) |
| | | SEC 2 B (2) (Skill Base Course of DSE Subject) |
| | S1 (Special 1) | DSE 1 B (3) |
| | S2 (Special 2) | DSE 2 B (3) |
| | (Special 1 & Special 2 ) | |
| | Environment Science | Environment Science (2) |
| V | Compulsory English | Compulsory English (3) |
| | G 3 ( General Paper) | CC 1 E (3) |
| | G 3 ( General Paper) | CC 2 E (3) |
| | G 3 ( General Paper) | SEC 1 C (3) |
| | | SEC 2 C (2) (Skill Base Course of DSE Subject) |
| | S 3 (Special 1) | DSE 1 C (3)+1 ( Research Project, field visit, etc) |
| | S 4 (Special 2) | DSE 2 C (3)+1 (Research Project, Field visit etc) |
| | | GE 2 A (2) |

| | | |
|---|---|---|
| VI | Compulsory English | Compulsory English (3) |
| | G 3 ( General Paper) | CC 1 F (3) |
| | G 3 ( General Paper) | CC 2 F (3) |
| | G 3 ( General Paper) | SEC 1 D (3) |
| | | SEC 2 D (2) (Skill Base Course of DSE Subject) |
| | S 3 (Special 1) | DSE 1 D (3)+1 (Research Project, field visit etc) |
| | S 4 (Special 2) | DSE 2 D (3)+1 ( Research Project, field visit etc) |
| | | GE 2 B (2) |

**Note:**

1. **Semester V and VI -DSE 3+1 = One credit is for Research Project/field visit/ or any other subject-centric activities to be taken by the students in consultation with the concerned teacher.**

2. **For III & IV Semester B.A. in Geography will have (3)+1 Credit for DSE 2A and DSE 2B.**

**GE: Generic Elective Course**

## ✲ वाणिज्य शाखा ✲

(Three year Integrated B. Com. Degree Course.)

वाणिज्य शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला पहिल्या वर्षी (एफ.वाय.बी.कॉम.) सात पेपर्स, दुसऱ्या वर्षी (एस.वाय.बी.कॉम.) सहा पेपर्स आणि तिसऱ्या वर्षी (टी.वाय.बी.कॉम.) सहा पेपर्स असा एकूण १९ पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास पुढीलप्रमाणे राहील.

### F.Y.B.Com. (प्रथम वर्ष वाणिज्य)

शै.वर्ष २०१९-२० पासून प्रथम वर्षासाठी (एफ.वाय.बी.कॉम.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

1) Compulsory English
2) Financial Accounting
3) Business Economics (Micro)
4) Mathematics & Statistics
5) Organisational Skills Development
6) Marketing and Salesmanship
7) Marathi
8) Banking and Finance

### S.Y.B.Com. (द्वितीय वर्ष वाणिज्य)

शै.वर्ष २०२०-२१ पासून प्रथम वर्षासाठी (एस.वाय.बी.कॉम.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

1) Business Communication
2) Corporate Accounting
3) Business Economics (Macro)
4) Principles & Functions of Business Management
5) Elements of Company Law
6) **SPECIAL GROUP (any One of the Following)**
   A) Marketing Management Paper - I
   B) Business Administration Paper - I
   C) Banking and Finance Paper - I
   D) Cost and Wroks Accounting Paper - I

### T.Y.B. Com. (तृतीय वर्ष वाणिज्य)

शै.वर्ष २०२१-२२ पासून प्रथम वर्षासाठी (एस.वाय.बी.कॉम.) Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० मार्क्सची परीक्षा होईल व त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल. बी.कॉम. डिग्री पुर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांला एकूण १४० क्रेडीटची आवश्यकता असते. १३२ क्रेडीट हे शैक्षणिक अभ्यासक्रमातून प्राप्त होतात. तर ०८ क्रेडीट हे अतिरिक्त अभ्याक्रमाव्यतिरिक्त मिळवावे लागतात. विद्यार्थ्याला तीन वर्षामध्ये १४० क्रेडीट पूर्ण करणे अनिवार्य असते.

**Compulsory Group**

1) Business Regulatory Framework (M.Law)
2) Advanced Accounting
3) International Economics
4) Auditing and Taxation

5) & 6) **Special Group**

A) Marketing Management paper II and III

B) Business Administration paper II and III

**टीप : S.Y.B.A. व S.Y.B.Com. या वर्गासाठी पर्यावरण जनजागृती हा विषय सक्तीचा आहे.**

# B.Com Credit Pattern Scheme

**SCHEMES OF CREDITS –**

**Total credits for three year integrated B.Com. Course is as follows:-**

| Sr. No. | Semester No | No. of courses | Lecture Hours | Credit per course | Credit for practical courses | Add on course credit (*) | Lectures + Practical + add on courses= Total Credits |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | I | 7 | 48 | 3 | 1 | 1 | 21 +2 =23 |
| 2 | II | 7 | 48 | 3 | 1 | 1 | 21 +2 =23 |
| 3 | III | 6 | 48 | 3 | 2 | 0 | 18+2 =20 |
| 4 | IV | 6 | 48 | 3 | 2 | 2 | 18+2+2 =22 |
| 5 | V | 6 | 48 | 3 | 3 | 0 | 18+3=21 |
| 6 | VI | 6 | 48 | 3 | 3 | 2 | 18+3+2 =23 |
| | Total No. of credits | | | | | | 132 |

**Suggested Add On courses (*)**

| Sr. No. | Add on course | Class | Semester | Credit |
|---|---|---|---|---|
| 1. | Value added course - I | F.Y.B.Com. | I | 1 |
| 2. | Value added course – II | F.Y.B.Com. | II | 1 |
| 3. | Environment Awareness | S.Y.B.Com. | IV | 2 |
| 4. | Specific Add - on Course related to specialized Course/ Internship | T.Y.B.Com. | VI | 2 |
| Total | | | | 6 |

**2. SCHEME OF CREDITS (NON-CGPA):**

In addition to the compulsory credits of 132, the student has to earn additional 08 credits from the following groups by taking/participating/conducting respective activities. These extra credits will not be considered for CGPA calculation; however, these are mandatory for the completion and award of B.Com degree.

**B.COM Degree.**

* Courses in Group 1 and Group 2 are compulsory (02 Credits Each).
* The student has to earn the remaining 04 Credits through participation in the various activities from Group 3 to Group 10
* The student can earn a maximum of 04 credits from each group: Group 3 to Group 10.
* A student is encouraged to earn a maximum of 04 credits in a year.

| Group | Activity | Credits |
|---|---|---|
| 1. | **Physical Education** | |
| | F.Y.B.Com (Sem-I) | 01 |
| | F.Y.B.Com (Sem-II) | 01 |
| | Note: Group 1 is compulsory for all the students as stated above | |
| 2. | **Democracy, Elections And Good Governance** | 02 |
| | F.Y.B.Com (Sem-II) | |
| | Note: Group 2 is compulsory for all the students as stated above | |
| 3. | **Sports Representation: At College Level** | 01 |
| | State/ University/ National Level | 02 |
| | International Level | 03 |
| 4. | **NSS/ NCC related** | |
| | NSS/ NCC - Participation in Annual Camp | 01 |
| | NCC (awarded B or C certificate) | 02 |
| | NSS/ NCC RD Parade participation | 04 |

| | | |
|---|---|---|
| 5. | Avishkar Participation<br>College level<br>University level/State level<br>Winner at state level<br>Participation in extension activity of College<br>Participation in Cultural activity of College | <br>01<br>02<br>04<br>01<br>01 |
| 6. | Research paper presentation<br>State/National level<br>International level | <br>01<br>02 |
| 7. | Participation in Summer school (minimum 30 hours)<br>or<br>Short Term Course (minimum 30 hours) | Maximum<br>02<br>Maximum<br>02 |
| 8. | Scientific survey /Societal survey | 02 |
| 9. | Field visit/ Study tour/ Industrial visit/ Participation in Curricular Competition/ Co-curricular Competition/ Commerce Festival | 01 |
| 10. | Online Certificate Course/ MOOCs<br>(minimum 15 hours per credit) | Maximum<br>04<br>credits |

## आर २०१ कला विद्याशाखा

बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जातांना विद्यार्थी प्रथम वर्षाच्या जास्तीत जास्त दोन हेडस् ऑफ पासिंगमध्ये अनुत्तीर्ण असला तरी द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. तसेच द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जातांना विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या जास्तीत जास्त दोन हेडस् ऑफ पासिंगमध्ये अनुत्तीर्ण असला तरी त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व हेडस् ऑफ पासिंगमध्ये उत्तीर्ण असल्याशिवाय त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशास पात्र समजण्यात येणार नाही.

## आर. २०२ वाणिज्य विद्याशाखा

बी.कॉम अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जातांना विद्यार्थी प्रथम वर्षाच्या लेखी परीक्षेच्या जास्तीत जास्त दोन हेडस् ऑफ पासिंगमध्ये आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या एक हेडस् ऑफ पासिंगमध्ये अनुत्तीर्ण असला तरी त्यास द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. तसेच द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जातांना विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या लेखी परीक्षेच्या जास्तीत जास्त दोन हेडस् ऑफ पासिंगमध्ये अनुत्तीर्ण असला तरी त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व हेडस् ऑफ पासिंगमध्ये उत्तीर्ण असल्याशिवाय त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशास पात्र समजण्यात येणार नाही.

१) शै.वर्ष २०१९ पॅटर्नप्रमाणे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला व वाणिज्य या वर्गाची Credit and Semister System या नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रथम व द्वितीय सेमीस्टरची प्रत्येक विषयाची ३०+७० = १०० गुणांची परीक्षा होईल. त्याचा स्वतंत्रपणे निकाल जाहीर करण्यात येईल.

**टीप :** शैक्षणिक वर्षात भरावयाच्या फी चा तपशील- विद्यापीठाच्या नवीन नियमाप्रमाणे राहील.

२) मागासलेल्या जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना भरावयाचा फी चा तपशील कार्यालयातून समजावून घ्यावा.

**सूचना-** उच्च माध्यमिक (एच.एस.सी.) शिक्षणानंतर प्रथमच महाविद्यालयात प्रवेश घेतांना अथवा अन्य विद्यापीठातील महाविद्यालयातून या महाविद्यालयात प्रवेश घेतांनाच त्यांना पात्रता फी भरावी लागेल.

१) **एकदा भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.** तसेच प्रवेश घेतल्यानंतर केव्हाही महाविद्यालय सोडले तरी संपूर्ण सत्राची फी भरणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालय सोडल्यानंतर पुढील वर्षी सप्टेंबरमध्ये डिपॉझिट परत केले जातील. मात्र महाविद्यालय सोडल्यापासून ६ महिन्याच्या आत डिपॉझिट परत नेले नाहीत तर ते पैसे महाविद्यालयाच्या खात्यात जमा होईल.

### प्रवेश अर्ज :

१) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या माहितीपत्रकासोबत दिलेले प्रवेश अर्ज भरून शक्यतो मुदतीचे आत नावे दाखल करावीत.

२) पुणे विद्यापीठाच्या क्षेत्रातील इतर महाविद्यालयामधून येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या महाविद्यालयाकडून ट्रान्सफरन्स सर्टिफिकेटस, कॅरेक्टर सर्टिफिकेट् मिळावयास हवीत. कॉलेजमध्ये प्रवेत घेतांना विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह फी भरून अर्ज करावा.

३) पुणे विद्यापीठाखेरीज इतर विद्यापीठांतून (महाराष्ट्राबाहेरील शिक्षण मंडळाकडून) येणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापीठाकडून (महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाकडून) आपल्या प्रवेश पात्रतेचा दाखला (Eligibility Certificate) मिळविलेले असणे आवश्यक आहे. त्या अर्जासोबत पुढील दाखले व त्यांच्या टाईप व ॲटेस्टेड केलेल्या दोन प्रती जोडलेल्या असणे आवश्यक आहे.

१) विद्यापीठ स्थलांतर दाखला (Migration Certificate)

२) कॉलेज स्थलांतर दाखला (Transfer Certificate)
शाळा सोडल्याचा दाखला (School Leaving Certificate)

३) आवश्यक गुणपत्रक (Statement of Marks)

४) उत्तीर्ण झाल्याचा दाखला (Passing Certificate)

५) वर्तणुकीचा दाखला (Character Certificate)

वरील प्रकारची प्रमाणपत्रे दाखल होईपावेतो दिला जाणारा प्रवेश तात्पुरता समजावयाचा आहे. तरूर ती सर्टिफिकेटस् दाखल केल्यानंतर प्रवेश कायम समजण्यात येईल. ही सर्टिफिकेटस् जर पहिली टर्म संपण्यापुर्वी दाखल केली नाही तर ह्या महाविद्यालयामध्ये भरलेली टर्म नामंजूर करण्यात येईल. व नंतर महाविद्यालयातून नाव कमी करण्यात येईल. तसेच महाविद्यालयामधून नाव कमी करावयाचे असल्यास कार्यालयाकडे तसे लेखी कळवावे. तसे न केल्यास नाव कमी केले जाणार नाही व अशा विद्यार्थ्याकडून संपूर्ण वर्षाची फी वसूल केली जाईल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी तहसिलदार यांच्या सहीचा जातीचा दाखला काढल्यानंतरच प्रवेश घ्यावा.

**सवलती व शिष्यवृत्या–**

(सविस्तर माहिती कार्यालयात मिळेल)

१) माध्यमिक शाळांना जोडल्या गेलेल्या ५वी ते ७ वी च्या वर्गात शिकविणाऱ्या एस.एस.सी/डी.एड अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी शैक्षणिक सवलत.

२) Government of India B.C.Scholarship – मागासलेले वर्ग, वर्गीकृत जाती जमाती, यामधील विद्यार्थ्यांना दरमहा केन्द्र सरकारकडून शिष्यवृत्ती.

३) स्वातंत्र सैनिकांच्या मुला-मुलींसाठी शैक्षणिक सवलती.

४) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींसाठी शैक्षणिक सवलती.

५) अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत.

६) महाविद्यालयामार्फत मिळणारी फी माफी-विविध परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे शिष्यवृत्या दिल्या जातात. तसेच गरीब होतकरू विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहाय्य निधीतून

सहाय्य दिले जाईल. विद्यार्थ्याची उपस्थिती, वर्तणूक अभ्यासातील प्रगती आणि गरजेची तीव्रता या गोष्टीचा विचार करून अशी मदत दिली जाईल. वर दिलेल्या तसेच अन्य शिष्यवृत्या आणि सवलती या संबंधीच्या सूचना वेळोवेळी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येतील. विद्यार्थ्याने अशा सूचना काळजीपूर्वक वाचून दिलेल्या मुदतीत तत्संबंधीची पूर्तता करावी, त्यासाठी विद्यार्थ्यांनी सूचना फलक वाचण्याची काळजी घ्यावी. नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

## शिस्तीसंबंधी आणि इतर आवश्यक सूचना –

१) प्रवेश अर्जात निश्चित केलेले विषय ओळख पत्रावर लिहावेत व तेच विषय विद्यापीठ परीक्षा फॉर्ममध्ये लिहावेत. त्यामध्ये बदल केल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाकडे असणार नाही याची नोंद घ्यावी. ओळखपत्र हरवल्यास दंड भरून नविन ओळखपत्र मिळेल.

२) दैनंदिन उपस्थिती, स्वाध्याय , अंतर्गत चाचण्यांना गैरहजर राहणारे आणि महाविद्यालयाला अपायकारक असे वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्र परीक्षेस बसू देण्याचा किंवा बसू न देण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

३) विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा विहित फॉर्म भरून प्रवेश घेतला पाहिजे. महाविद्यालयातील वस्तूंची नासधूस करणे, महाविद्यालयाला अपायकारक असे वर्तन किंवा अशा हेतूसाठी इतरांना महाविद्यालयामध्ये आणणे, या गोष्टी गुन्हापात्र ठरतील, यासाठी पालकांनी विहित ठिकाणी तशी स्वाक्षरी करावी.

४) प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालयामार्फत ओळखपत्र दिले जाईल. त्यावर पासपोर्ट आकाराचा फोटो चिटकवला पाहिजे. महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांनी, अधिकाऱ्यांनी व प्रशासकीय सेवक यांनी मागणी करताच कोणतीही सबब न सांगता ओळखपत्र सादर केले पाहिजे.

५) कोणत्याही विद्यार्थ्यास सुरूवातीला एका सत्रात प्रवेश दिल्यानंतर त्या सत्रातील त्याचे वर्तन चांगले असेल तरच त्याला पुढील सत्रात प्रवेश दिला जाईल.

६) प्रत्येक वर्षी नव्याने प्रवेश घेणे आवश्यक असते.

७) एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी भरलेल्या फीच्या पावत्या संबंधीत लिपिकाकडून त्या दिवशी घ्याव्यात याबाबत काही अडचण असल्यास प्राचार्यांना त्वरीत भेटावे. अन्यथा फी बाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

८) विद्यार्थ्यांची उपस्थिती सरासरी ८०% असणे आवश्यक आहे. नसल्यास वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

९) महाविद्यालयाच्या सूचना फलकावर, वेळोवेळी लावलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा होणाऱ्या नुकसानीस तो विद्यार्थीच जबाबदार राहील.

१०) वर्ग चालू असतांना महाविद्यालयाच्या आवारात फिरणे किंवा अयोग्य वर्तन करणे या गोष्टी गुन्हापात्र ठरतील.

११) महाविद्यालयाच्या आवारात रेडिओ व कॅमेरा,आणू नयेत. आणि वाहने महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या जागी ठेवावीत तसेच कोणतेही महाविद्यालयीन वृत्त विद्यार्थ्यांनी प्राचार्याच्या संमतीशिवाय प्रसिध्दीस देऊ नये.

१२) पालकांच्या नावाखाली दुसऱ्यास महाविद्यालयामध्ये आणणे गुन्हा आहे.

१३) विद्यार्थ्यांचे एकंदर वर्तन वरील सुचनांचे विरोधी आढळून आल्यास पुणे विद्यापीठ कायदा १९७४ यु.एस. ८७(४) आणि सी. (८) आणि पुणे विद्यापीठ क्र. १५३/८८ नुसार प्राचार्य आपले अधिकार वापरू शकतात. त्या अधिकारानुसार एखाद्या विद्यार्थ्यास काढून टाकणे किंवा विशिष्ट कालावधीकरीता विशिष्ट अभ्यासक्रमास जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत बसू न देणे किंवा प्रतिबंध करणे किंवा त्याचा विशिष्ट परीक्षेचा निकाल रद्द करणे ही कार्यवाही केली जाऊ शकेल याची नोंद घ्यावी.

१४) ह्या महाविद्यालयात विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका होणार नाहीत. मात्र गुणवत्तेनुसार विद्यार्थी प्रतिनिधीची नियुक्ती केली जाईल.

१५) कोणतेही कारण न देता कोणत्याही क्षणी प्रवेश देणे किंवा प्रवेश रद्द करणे प्राचार्यांच्या स्वाधीन राहील.

१६) कोणत्याही कारणास्तव शाखा बदल करता येणार नाही.

१७) विद्यार्थ्यांना किंवा विद्यार्थीनींना परस्पर वर्गात कोणीही भेटू नये, कार्यालयात अगोदर चौकशी करावी.

१८) कोणतेही व्यसन करणे किंवा वाईट सवयी गुन्हापात्र ठरतील.

१९) महाविद्यालयाचे वर्ग चालू असतांना आवारात फिरणे किंवा अयोग्य वर्तन करणे या गोष्टी गुन्ह्यास पात्र ठरतील.

२०) महाविद्यालयातून संबंधित विद्यार्थ्याने कागपत्र आवश्यक ती सर्टिफिकेटस् परीक्षा रिसिटस्, गुणपत्रक, एल.सी./टी.सी. इ. घेण्यासाठी प्रत्यक्ष विद्यार्थी ओळखपत्रासह उपस्थित असणे आवश्यक आहे. टी.सी.साठी ८ दिवस अगोदर अर्ज करावा.

२१) १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, समाजदिन, महाराष्ट्र दिन व इतर सर्व कार्यक्रमांना हजर राहणे आवश्यक आहे. गैरहजर विद्यार्थ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

२२) सर्व प्रकारच्या मुळ दाखल्याच्या पुरेशा प्रती झेरॉक्स करून ठेवाव्यात व प्रवेश घेण्यापुर्वी Employment साठी नांव नोंदणी करून घ्यावी. एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव दाखला किंवा मुळ कागदपत्रे परत मिळणार नाहीत. तसेच कुठल्याही प्रकारच्या छायांकित प्रती मिळणार नाहीत.

२३) महाविद्यालयात स्नेहसंमेलन होणार नाही फक्त विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित केला जाईल.

२४) ड्युप्लीकेट दाखल्यासाठी मागणी करू नये. मूळ दाखला हरवला असेल किंवा चोरी गेला असेल तर त्यासाठी अगोदर कायदेशीररित्या पोलीसांत तक्रार करून महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

२५) कोणत्याही नियमांत बदल करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

२६) विद्यापीठ परीक्षा फॉमर्स भरल्यानंतर गैरवर्तन आढळल्यास किंवा प्राचार्यांना नियम नं. १३ नुसार कोणत्याही कारणास्तव परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

२७) सर्व प्रकारचे फी परीक्षा सुरू होण्याअगोदर भरावी, अन्यथा परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

२८) **महाविद्यालयाने ठरवुन दिलेला गणवेश (ड्रेसकोड) सर्व विद्यार्थ्यांवर (प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष) बंधनकारक राहील.**

२९) महाविद्यालयाच्या आवारात तसेच वर्गात मोबाईल वापरावर बंधन राहील.

३०) महाविद्यालयाच्या आवारात कोणतेही व्यसनाधिन पदार्थांचे सेवनावर बंदी राहील.

३१) प्रत्येक विद्यार्थ्याला संगणक प्रशिक्षण सक्तीचे राहील.

३२) प्रत्येक वर्षी सत्रांत परीक्षा होईल. महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांची या परिक्षेस उपस्थिती अनिवार्य राहील.

**टीप: शैक्षणिक वर्षात भरावयाच्या फी चा तपशिल –**

**❋ शासन विद्यापीठ व संस्थेच्या ध्येयधोरणानुसार निश्चित करण्यात आलेला फी चा तपशील प्रवेशाच्या वेळी नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल आणि त्यानुसार प्रवेश फी आकारली जाईल.**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

**परिपत्रक क्र. १५३ – १९८८**

**(स्वैर भाषांतर)**

सर्व संबंधितांना याव्दारे सुचित करण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने अध्यादेश क्र. १५७ संमत केला असून तो पुढील प्रमाणे हा अध्यादेश २० मे १९८८ पासून अंमलात आला आहे. अध्यादेश क्र. १५७ :

## विद्यार्थ्यांकडून चांगले वर्तन व शिस्तपालन :

(पुणे विद्यापीठ कायदा १९७४ कलम ८७ आणि कलम ३९ उपकलम (३) अन्वये)

**(१)** आपल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीत प्रत्येक विद्यार्थी हा शिस्तपालन व सुवर्तन या संबंधात सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यकक्षेत राहील. असा सक्षम अधिकारी विद्यार्थ्यांच्या बेशिस्त वा गैरवर्तनाबाबत योग्य ती कारवाई करेल.

**(२) व्याख्या :** निराळा उल्लेख नसल्यास संबंधित अधिसूचनेत :

१) विद्यार्थी म्हणजे विशिष्ट अभ्यासक्रम पूर्ण करण्यसाठी व पदवी/पदविका प्राप्त करून घेण्यासाठी संलग्न मान्यताप्राप्त संस्था यात प्रवेश घेणारी व्यक्ती

टिप : यात बहिस्थ विद्यार्थ्यांचा देखील समावेश आहे.

२) संस्था म्हणजे विद्यापीठ विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय मान्यता प्राप्त संस्था त्यात संस्थेचा परिसर, वसतीगृह, क्रिडांगण, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रिडासंकुल यांचा समावेश होतो.

३) या अधिसूचनांचे सक्षम अधिकारी म्हणजे विद्यापीठातील संबंधित विभागप्रमुख संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे प्रमुख बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी सक्षम अधिकारी म्हणजे उपकुलगुरू यांनी अधिकार दिलेली व्यक्ती होय.

तथापी विद्यापीठ परीक्षेसंबंधातील गैरवर्तनाबाबत विद्यापीठ कार्यकारी मंडळ हेच फक्त सक्षम अधिकारी म्हणून राहील.

**(३) विद्यार्थ्यांवरील बंधनकारक बाबी – प्रत्येक विद्यार्थी प्रत्येक वेळी**

१) योग्य पध्दतीने वागेन

२) योग्य ती वर्तणूक ठेवेन

३) संस्थेच्या परिसरात, वसतीगृहात तसेच इतरत्र सुध्दा (उदा. बसेस, रेल्वे, सार्वजनिक ठिकाणे, वनभोजन, संस्था आयोजित शैक्षणिक सहली व क्रिडांगण) तो कडक शिस्तीचे पालन करेन.

४) खात्री करेन की त्याची जाणतेपणी वा अजाणतेपणी झालेली कोणतीही कृती संस्था, प्रतिष्ठान किंवा संबंधित अधिकारी यांची बदनामी करणार नाही.

५) आपली कोणतीही तक्रार, निवेदन, शिष्टमंडळ इ. ज्यांचा संबंध संस्थेशी आहे. परस्पर वर्तमानपत्रे वा इतर कोणतीही बाह्य संस्था यांच्याकडे, संस्थाप्रमुखांच्या व्दारा पाठविण्याशिवाय देणार नाही. (म्हणजेच कोणतीही तक्रार वा निवेदन परस्पर करता कामा नये.)

**(४) वरील घटक क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या बाबींच्या विरोधातील विद्यार्थ्यांचे वर्तन म्हणजे गैरवर्तन होय. वर उल्लेखलेली एक किंवा अनेक बाबींचे उल्लंघन म्हणजे बेशिस्त होय. तसेच**

१) संस्थेच्या कायदेशीर कामकाजात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अडथळा आणणे किंवा आणण्याचा प्रयत्न करणे.

२) निर्धारीत वेळापत्रकानुसार व्याख्याने, तास, प्रात्यक्षिके, स्वाध्याय आणि अभ्यासक्रम यांना नियमित गैरहजेरी.

३) व्याख्याने, तास, प्रात्यक्षिके इ. ना. वारंवार असणारी अनुपस्थिती.

४) प्रचार करणे, वस्तू किंवा पैसा या स्वरूपात निधी संकलन करणे किंवा अशा कृतीशी संबंध असणे.

५) सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय संस्थेच्या परिसरातील संस्थेशी, संस्थेने भाड्याने घेतलेली (उदा. वसतीगृह, महाविद्यालय इ. इमारती) इमारत ताब्यात घेणे व तिचा वापर करणे.

६) अनधिकृत व्यक्तीला संस्थेच्या परिसरातील इमारतीचा ताबा व वापर असल्यास अशा व्यक्तीकडे हेतूत: दुर्लक्ष करणे.

७) पूर्णपणे चुकीची, खोटी तसेच दिशाभूल करणारी माहिती देऊन महाविद्यालयातील पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळविणे.

८) कोणताही विद्यार्थी किंवा विद्यार्थ्यांचा गट कोणत्याही प्रकारची कृती वर्गात, प्रयोगशाळेत, परिसरात, परिक्षेत्रात क्रिडांगणावर क्रिडासंकुल किंवा शैक्षणिक वा सांस्कृतिक उपक्रमांच्या जागा येथे पार पडत असेल तर त्या विद्यार्थ्यास किंवा विद्यार्थ्याचा गटास तशी कृती करण्यास अडथळा आणणे.

९) संस्थेकडून कोणत्याही प्रकारचा फायदा प्राप्त करून घेण्याच्या हेतूने हेतुत: खोटी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविणे.

१०) संस्थेच्या परिसरात असतांना कोणत्याही प्रकारची प्राणघातक शास्त्रे हत्यारे, स्फोटके तसेच धोकादायक वस्तु पदार्थ जवळ बाळगणे, किंवा त्याचे सेवन करणे.

११) संस्था वा संस्थेबाहेर कोणत्याही विद्यार्थ्याचा कोणत्याही प्रकारचा शारीरिक व मानसिक छळ करणे.

१२) इतर विद्यार्थी संस्थेची अधिकारी तसेच पदाधिकारी, कर्मचारी किंवा त्यांचे कुटूंबीय त्यांच्या स्वास्थ्यास धोका निर्माण करणारे वर्तन करणे वा त्यांच्या अस्वास्थ्यास कारणीभुत होणे.

१३) संस्थेचा परिसर किंवा वसतीगृह यासारख्या ठिकाणी हिंसात्मक कृत्य करणे, दहशत निर्माण करणे, हल्ला व हल्याची धमकी देणे या सारखी कृत्ये करणे.

१४) संस्थेचे कोणतेही कागदपत्र किंवा कार्यालयीन दस्तऐवज यांचे नुकसान करणे वा तसा प्रयत्न करणे.

१५) संस्थेने आयोजित केलेली बैठक, सभा, समारंभ, वा खेळ इतर सांस्कृतिक व सार्वजनिक ठिकाणी होणारे इतर कार्यक्रम या ठिकाणी अशोभनीय गैरवर्तन करणे वा गैरशिस्तीने वागणे.

१६) संस्थेतील कोणताही विद्यार्थी, कर्मचारी यांच्या मालकीच्या किंवा संस्थेच्या मालकीच्या वस्तु, मालमत्ता यांची चोरी करणे, त्यांचा अपहार करणे तसेच नासधूस करणे.

१७) हिंसाचारास प्रवृत्त होणे. कोणत्याही प्रकारचे हिंसक आंदोलन व निदर्शन यात सहभागी होणे किंवा हिंसात्मक संप संस्थेत घडवणे.

१८) संस्थेचे कोणतेही पदाधिकारी, कर्मचारी यांना घेराव घालणे किंवा तशा कृतीस प्रवृत्त करणे.

१९) सक्षम अधिकाऱ्याने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या नियमांचे किंवा सूचनांचे उल्लंघन करणे.

२०) संस्थेच्या परिसरात जुगार, मटका इ. प्रकार खेळणे.

२१) सक्षम अधिकाऱ्याने प्रतिबंध केलेले कोणतेही गैरकृत्य करणे.

२२) विद्यार्थ्यांच्या विरोधात केलेल्या आरोपांची चौकशी करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यापुढे हजर राहण्यास किंवा पुरावे सादर करण्यास नकार देणे.

२३) पुणे विद्यापीठ कायदा १९९४/अधिनियम/अधिसूचना/किंवा त्या अंतर्गत तयार केलेल्या नियमांचे उल्लंघन करणे.

२४) गुन्हेगारी स्वरूपाचा अपराध तसेच अनैतिक वर्तन या संबंधात न्यायालयात दोषी ठरणे.

२५) या अधिसुचनेत समाविष्ट न झालेली अशी दुसरी कोणतीही बाब जी सक्षम अधिकाऱ्याने किंवा बेशिस्त या सदरात टाकली आहे अशी कृती करणे.

**(५) गैरशिस्त किंवा गैरवर्तन याबाबत दोषी ठरणाऱ्या विद्यार्थ्यासाठी सक्षम अधिकारी पुढील पैकी एक किंवा अनेक शिक्षांची अमंलबजावणी करू शकेल.**

१) ताकीद देणे, ठपका ठेवणे, दोषास जबाबदार धरणे.

२) रू. ३००/– पर्यंत दंड करणे.

३) विद्यार्थ्यांस मिळणारी शिष्यवृत्ती, बक्षीस, पदक रद्द करणे.

४) संबंधित संस्थेतून विद्यार्थ्यांस काढून टाकणे.

५) प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमातून संस्थेतून विद्यार्थ्यांचे नांव कमी करून त्याचा प्रवेश रद्द करणे. परीक्षेसाठी विद्यार्थ्यास बसू देण्याची परवानगी नाकारण्याचा कमाल कालावधी पाच वर्षापर्यंत असेन.

६) विद्यार्थी ज्या परीक्षेस बसला आहे. त्या संबंधित परीक्षेचा निकाल रद्द करणे.

७) कमाल पाच वर्षाच्या कालावधी पर्यंत विद्यार्थ्यास संस्थेतून काढून टाकणे.

**(६) उपनियम क्र. ५ मध्ये उल्लेखिलेली शिक्षा/दंड देण्याइतपत सत्कृत दर्शनी पुरावा असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे मत झाले तर ते स्वत: किंवा याबाबत अधिकार दिलेली दुसरी व्यक्ती पुढीलप्रमाणे चौकशी करेन.**

१) संबंधित विद्यार्थ्याने गैरवर्तन/बेशिस्त या बाबतच्या मुदतीत पत्राची योग्य ती लेखी सूचना दिली जाईल.

२) अशा आरोपांबाबत विद्यार्थ्यांस १५ दिवसा पर्यंतच्या मुदतीत त्याचे स्वत:चे म्हणणे लेखी स्वरूपात मांडावे लागेल.

३) आपले लेखी म्हणणे विद्यार्थ्याने विवक्षित मुदतीत सादर न केल्यास एकतर्फी चौकशी सुरू राहील.

४) चौकशी अधिकाऱ्याने विद्यार्थ्यांविरूध्द जर तोंडी पुरावे नोंदवून घेतले असतील तर अशा पुरावेदारांची उलट तपासणी करण्याची संधी आरोपी विद्यार्थ्यास देण्यात येईल.

५) उपनियम ६ (१) मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे नोटीस दिली गेली असेल व संबंधित आरोपी विद्यार्थ्यास आपल्या प्रकरणातील महत्वाची कागदपत्रे पहावयाची असतील/तपासायची असतील तर अशी कागदपत्रे पाहण्यासाठी देण्याचा अधिकार चौकशी अधिकाऱ्यास राहील.

६) आपल्या म्हणण्याच्या समर्थनासाठी आरोपी विद्यार्थ्यास योग्य ती कागदपत्रे उपलब्ध करून द्यावी लागतील. प्रकरणाचा निकाल लागण्यापुर्वी चौकशीच्या कोणत्याही टप्प्यात चौकशी अधिकारी पुरावे कागदपत्रे इ. स्विकारून घेऊ शकतील.

७) चौकशी सुरू असतांना आरोपी विद्यार्थ्याचा वतीने कायदेशीर सल्लागारास चौकशी अधिकाऱ्यापुढे येऊन बाजू मांडण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

८) विद्यार्थ्याकडून घडलेले गैरवर्तन/बेशिस्त या बाबतचा निष्कर्ष योग्य त्या कारणांसह व इतिवृत्तासह चौकशी अधिकारी सक्षम अधिकाऱ्यास सादर करेन.

९) चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्ष पडताळणीवरून सक्षम अधिकारी या प्रकरणात योग्य ती कार्यवाही करतील. तथापी पुढीलप्रमाणे
परिस्थिती निर्माण झाल्यास उपरनिर्दिष्ट कार्यवाही पध्दती अवलंबण्याची गरज नाही. किंवा त्यामधील बाबी पूर्णत: अथवा अंशत: सूट दिली जाऊ शकते.

१) जेव्हा आरोपी विद्यार्थी लेखी स्वरूपात आरोप कबूल करतो.

२) नैतिक बाबींचा उल्लंघनाचा आरोप शाबीत होत असून त्यात आरोपी विद्यार्थी नैतिक गुन्हा स्वरूपात मोडतो.

३) जेव्हा आरोपी विद्यार्थी फरारी झाला आहे किंवा तत्सम अन्य काही कारणास्तव त्याच्याशी संपर्क साधणे अशक्य आहे.

४) सक्षम अधिकाऱ्याच्या मतानुसार जर आरोपी विद्यार्थ्यास ५०/– रू. पर्यंत दंडाची शिक्षा, ठपका, ताकीद पुरेशी असेन.

**७) संस्था प्रमुख/विद्यापीठाचे विभाग प्रमुख/महाविद्यालयांचे प्राचार्य यांचेकडून विद्यार्थ्याला संस्थेतून काढून टाकण्याची शिक्षा झाली असेल तर अशा विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे अपील करता येईल किंवा शिक्षा कुलगुरूंनी दिली असेल तर संबंधित विद्यार्थ्यांस अशा शिक्षेची नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाकडे अपील दाखल करण्याची मुभा राहील.**

**८) अशा विद्यार्थ्यांसंबंधातील सर्व कागदपत्रे संस्थाप्रमुख ठेवतील.**

**९) कोणत्याही विद्यार्थ्यांस प्रत्येक वेळी अशाप्रकारे दिलेल्या शिक्षेसंबंधीचे योग्य पत्र पोष्टाच्या दाखल्याने त्याचे पालक / आई–वडील यांना संस्थेकडून त्यांच्या महाविद्यालयाच्या दप्तरी उपलब्ध पत्त्यावर पाठवले जाईल.**

**१०) सदर नियमावलीची एक प्रत प्रत्येक विद्यार्थ्यांस प्रवेशाच्या वेळेस दिली जाईल व विद्यार्थ्यांकडून तशी पोहच घेतली जाईल. ही पोहच म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जासोबतचा एक दस्तऐवज असेल.**

**११) जर कुणा परकीय विद्यार्थ्यास एखाद्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला असेल तर संबंधित संस्था ह्या नियमावलीची प्रत त्या देशाच्या संबंधित दुतावासास आणि परराष्ट्र–व्यवहार विभाग यांना पाठवतील.**

सही
कुलसचिव

❖❖❖

## वर्गनिहाय विद्यार्थी संख्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२

## कला शाखा

| अ.नं. | वर्ग | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एफ.वाय.बी.ए. | ३२ | ७९ | १११ |
| २ | एस.वाय.बी.ए. | १७ | ४८ | ६५ |
| ३ | टी.वाय.बी.ए. | १९ | २५ | ४४ |

## वाणिज्य शाखा

| अ.नं. | वर्ग | मुली | मुले | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एफ.वाय.बी.कॉम. | २६ | २१ | ४७ |
| २ | एस.वाय.बी.कॉम. | २३ | २६ | ४९ |
| ३ | टी.वाय.बी.कॉम. | १६ | २२ | ३८ |


वर्ष दुसरे
महाराष्ट्र राज्य
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र
यांच्या संयुक्त विद्यमाने
MITSC
करिअर कट्टा
युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....
आयएएस आपल्या भेटीला
• राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा/ महाराष्ट्र लोकसेवा आयोग
• पोलीस भरती
• बँकिंग सेवा
• स्टाफ सिलेक्शन कमिशन
• केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु पी एस सी)
उद्योजक आपल्या भेटीला
• उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास
• व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन
• वित्त व्यवस्थापन
• निर्णय क्षमता
• जोखीम व्यवस्थापन (Risk Management)
• मनुष्यबळ व साधनसामुग्री व्यवस्थापन
• आधुनिक तंत्रज्ञान
ध्येयपूर्तीच्या वाटेवर सातत्याने ३६५ दिवस
यासोबत सभासद शुल्क ₹ ३६५/-भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ०३ वर्ष प्रति वर्ष ०५ या पद्धतीने १५ कोर्स मोफत दिले जातील.
Subscribe me
SCAN ME
नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी
7507652555 या नंबरवर आपले नाव करा
https://careerkatta.mitsc.co.in

| Course List | |
|---|---|
| 1) Python Programming | 26) Digital Banking |
| 2) Python for AI/ML | 27) Digital Marketing |
| 3) Python for web Development | 28) Political Ethics and Value |
| 4) Cloud computing | 29) Leadership Development |
| 5) Devops | 30) Literacy about Judicial Process |
| 6) Data analytics with tableau and power BI | 31) Constitutional Values and Ethics |
| 7) Social Media Profile Management | 32) Certificate in Office Administration |
| 8) Financial Literacy | 33) Certificate in Training Management |
| 9) Event Management | 34) Organic Farming |
| 10) Fund Flow Management | 35) Fruits and Vegetables Drying Dehydration and Technology |
| 11) Communication Skill & Personality Development | 36) Certificate course in World Politics |
| 12)बी पी टी १९५० संस्था नोंदणी कायदा प्रशिक्षण | 37) Certificate course in Rural Development |
| 13) Road Safety and Awareness Training | 38) Scientific Temperament |
| 14) परदेशी नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास | 39) Green Chemistry |
| 15) Foundation Course in Business Law | 40) Renewable Energy |
| 16) माहिती अधिकार कायदा प्रशिक्षण | 41) Nanotechnology |
| 17) Soft Skill Training Program | 42) Biotechnology |
| 18) Certificate Course in Human Right | 43) Medical Lab Technology |
| 19) Certificate Course in Journalism | 44) Nano Biotechnology |
| 20) Communication Skill Program | 45) Introduction to Forensic Science |
| 21) Content Writing Course | 46) Tourism Management |
| 22) Basic of Cost & Works Accounting | 47) Forensic Accounting |
| 23) E- Filling | 48) Cyber Law |
| 24) Soft Skill Development | 49) Office Management |
| 25) Introduction to Basic Concept of Accounting | 50) Consumer Protection Act 2019 |

# करिअर कट्टा विद्यार्थी नोंदणी फॉर्म

1) नाव :- ..........................................................................................

2) शिक्षण :- ......................................

3) ई-मेल आयडी :-.................................................................................

4) मोबाईल नंबर :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

5) महाविद्यालयाचे नाव :- ..................................................................

..........................................................................................................

6) महाविद्यालयाचा कोड :- ........................................

7) करिअर कट्टा कोर्सचे नाव :-

- IAS आपल्या भेटीला ☐
- उद्योजक आपल्या भेटीला ☐

8) जिल्हा :- ........................................

9) तालुका :- ................................

10) विद्यार्थ्यांची सही :- ......................................

## Academic Calendar for the year 2019 - 20

# CONSPECTUS OF ACTIVITIES

**June 2022 :-**

- 15th June - Commencement of the First Term
- Distrubution of Admission forms and Prospectus.
- Admission process to be followed after the declaration of the exam results.
- Departmental Meetings.
  Preparation of the Class - wise roll-call
- Staff meeting

**July 2022 :-**

- Curriculum Planning and task allotment
- 1st July, teaching programme begins
- Enrolment of cadets / Volunteers for N.C.C./ N.S.S.
  Inauguration functions of various Associations.

**August 2022 :-**

- 1st Aug. Death Anniversary Day of Lokmanya Tilak
- 15th Aug. Independence Day Celebration
- 19th Aug. 'Samajdin' celebration.

**September 2022 :-**

- 5th Sept. Teachers Day celebration.
- 24th Sept. N.S.S. Foundation Day.
- Medical Check-up & Blood Donation.
- Formation of Student Council.
- LMC Meeting
- Elocution Competition.

**October 2022 :-**

- 2nd Oct. Mahatma Gandhi Jayanti.
- Staff Meeting
- Diwali Vacation.
- University Exams (For Repeaters)
- Staff Academy (5-Lecture series)

**November 2022 :-**

- Terminal Examination.
- 2nd Term Teaching Schedule begins
- 14th. Nov. Children Day
- 25th Nov. Death Anniversary of Yashwantrao Chavan.
- 28th Nov. Death Anniversary of Mahatma Phule.

**December 2022 :-**

- N.S.S. Winter Camping Programme
- 6th Dec. Babasaheb Ambedkar "Mahaparinirvan".
- Filling the exam forms for UG Classes.
- Student Council meeting - Staff meeting
- Annual Sports Meeting.

**January 2023 :-**

- 3rd Jan. Savitribai Phule Jayanti
- LMC Meeting
- 12th Jan. Swami Vivekanand Jayanti .
- Celebration of yuva saptah
- 26th Jan. Republic Day Celebration.
- 30th Jan. Death Anniversary Day of Mahatma Gandhi.
- Respective Functions of Associations.

**February 2023 :-**

- Filling the Exam. forms for UG Classes.
- 10th Feb. Pune University Foundation Day.
- 19th Feb. Shiv Jayanti Celebration.
- One Day Seminar.
- Student's council meeting.

**March 2023 :-**

- The Practical Exams / Orals.
- 1st Year BA / B.Com. / Annual Exams.
- LMC Meeting

**April 2023 :-**

- IInd & IIIrd Year B.A. / B.Com. Exams.
- 14th April, Dr. Babasaheb Ambedkar Jayanti.
- Staff Academy (A Series of Five Lectures)
- Staff Meeting

**May 2023 :-**

- 1st May, Maharashtra Day Celebration.
- Summer Vacation begins.

**Note :** The Conspectus is a tentative planning of the yearly events and programmes. The college authorities may amend it as and when found necessary.

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खेडगाव

## डॉ. श्रीमती एस.टी. वाघ

प्राचार्या

### ❋ प्राध्यापक वृंद ❋


| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. डी.एन. कारे | सहा. प्राध्यापक | (अर्थशास्त्र) |
| २) | प्रा. श्रीमती ए.बी. डेर्ले | सहा. प्राध्यापक | (अर्थशास्त्र) |
| ३) | प्रा. व्ही.एस. शिंदे | सहा. प्राध्यापक | (वाणिज्य) |
| ४) | प्रा. पी.यु. लांडगे | सहा. प्राध्यापक | (वाणिज्य) |
| ५) | प्रा. श्रीमती ए.बी. गांगुर्डे | सहा. प्राध्यापक | (वाणिज्य) |
| ६) | प्रा. श्रीमती के.यु. निफाडे | सहा. प्राध्यापक | (मराठी) |
| ७) | प्रा. श्रीमती वाय.बी. गरूड | सहा. प्राध्यापक | (राज्यशास्त्र) |
| ८) | प्रा. पी.डी. देशमुख | सहा. प्राध्यापक | (राज्यशास्त्र) |
| ९) | प्रा. एन.व्ही. निकम | सहा. प्राध्यापक | (मानसशास्त्र) |
| १०) | प्रा. आर.एस. गांगुर्डे | सहा. प्राध्यापक | (मानसशास्त्र) |
| ११) | प्रा. ए.के. बचाटे | सहा. प्राध्यापक | (इंग्रजी) |
| १२) | प्रा. आर.व्ही. गांगुर्डे | सहा. प्राध्यापक | (भूगोल) |
| १३) | डॉ. डी.एस. गडाख | शा. संचालक | – |
| १४) | श्रीमती आर.आर. पाचोरकर | ग्रंथपाल | – |

### ❋ शिक्षकेतर सेवक ❋

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम.पी. ढुबे | कनिष्ठ लिपीक |
| २) | श्री. के.सी. भामरे | कनिष्ठ लिपीक |
| ३) | श्री. डी.ई. भरसट | कनिष्ठ लिपीक |
| ४) | श्री. एस.एस. खरात | शिपाई |
| ५) | श्री. पी.डी. सुर्यवंशी | शिपाई |
| ६) | श्री. पी.के. शिरसाठ | शिपाई |
| ७) | श्री. डी.एस. वाघमारे | वॉचमन कम शिपाई |

# ✻ जल प्रतिज्ञा ✻

- मी माझ्या जीवनदायिनी विषयी सदैव कृतज्ञ राहीन.
- पाणी हे जीवन आहे, तसेच पाणी हे मौल्यवान आहे. पाणी फुकट मिळते ही धारणा मी मनातून काढून टाकीन.
- पाण्याचा काटकसरीने वापर करीन, त्याचबरोबर जल संवर्धनासाठी कसोशीने प्रयत्न करीन.
- पाण्यावर माझ्या इतकाच इतरांचाही हक्क आहे. सम न्यायाने सर्वांसाठी पाणी ही भावना मी सतत जोपासेन.
- जीवनदायिनी प्रदुषित होणार नाही यासाठी मी व्यक्तिश: प्रयत्न करीन, तसेच माझ्या बंधु भगिनींना सुध्दा याची जाणीव करून देईन.
- सांडपाण्याच्या प्रश्नांची तीव्रता मला समजलेली असून घरगुती कारणासाठी मी कमीत कमी पाणी वापरीन.
- धरणांमध्ये ज्यांची घरे, शेती पाण्याखाली गेली आहे त्यांच्या विषयी मी सतत कृतज्ञ राहीन.
- सर्वांसाठी पाणी या प्रक्रियेत मी माझ्या बंधु भगिनींचा सहभाग मिळवीन व यासाठी विविध पातळीवर कार्य करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांना मी सदैव सहकार्य करीन.



## समाजगीत

जनकल्याणी देह झिजवूनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ।।धृ.।।
ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून घराघरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तीचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।१।।
नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करूया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणूनी रूतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करू पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करूनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।२।।
मूक अडाणी फुलवू अग्रणी त्यातूनी ही जिद्द
मुळात अबला करू या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ कराया द्या हो द्या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।३।।

**– कै. प्रा. श्रीरंग गुणे**

# सा.फु. पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**